दाखल दिनांक :०३/१०/२०२२
नोंदणी दिनांक :०६/१०/२०२२
निकाल दिनांक :२९/०४/२०२६
कालावधी :०३व ०६म २६ दि.

**CNR NO.MHSO160014732022**

# सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, करमाळा यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी अ.कि.शर्मा)

**नियमित दिवाणी दावा क्र.३५८/२०२२** **निशाणी क्र.७९**

**१. अर्चना नवनाथ आरदड,**
वय – ३२ वर्षे, धंदा – शेती
**२. मुकिंदा आनंता आरदड,**
वय – ८७ वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा. खातगांव नं.१, ता. करमाळा जि. सोलापूर .. **वादी**

**.. विरुध्द ..**

**१. गोरख विठ्ठल कवितके,**
वय – ४४ वर्षे, धंदा – शेती,
**२. कांताबाई गोरख कवितके,**
वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,
दोघे रा. कात्रज, ता. करमाळा, जि. सोलापूर ..**प्रतिवादी**

---

वादींतर्फे : विधीज्ञ श्री.वाय.ए.शिंपी
प्रतिवादींतर्फे : विधीज्ञ श्री.पी.बी.जाधव

---

## न्या य नि र्ण य

(पारित दिनांक २९ एप्रिल, २०२६)

१. वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकिदी करिता दाखल केलेला आहे.

२. वादींचे दाव्यातील थोडक्यात कथन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णनः–** डि.सोलापूर सब डि. व ता.करमाळा पैकी मौजे – खातगांव नं.१ हद्दीतील शेतजमीन मिळकत –

| (क.)(ग.)(नं.) | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| १११ पैकी | ००. ८४ | ००. ७५ |

**मधली पश्चिमेची** पो.ख. ००.२३

**एकुण ०१.०७**

यांची चतुःसिमा पुढीलप्रमाणे की,

**पुर्वेस** – याच गटातील भागवत मुकिंदा आरदड यांचा हिस्सा,

**दक्षिणेस** – याच गटातील बाळू आनंता आरदड याचा हिस्सा,

**पश्चिमेस** – याच गटातील सरकारी ओढा,

**उत्तरेस** – याच गटातील लक्ष्मण अनंता आरदड याचा हिस्सा.

येणेप्रमाणे चतुःसिमा मधील मिळकत जमीन आतील झाड – झुडूप, दगड–माती, बांध–बंधारे वगैरेसह ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन त्यावर असलेली १२.५ एच.पी. टेस्क्मो कंपनीची इलेक्ट्रीक मोटार यासह उजनी जलाशयावरून बागायत केलेली शेतजमीन (या मिळकतीला या पुढे **'वाद मिळकत'** म्हणून संबोधित करण्यात येणार जेणेकरून प्रस्तुत न्यायनिर्णयात पुनरावृत्ती होऊ नये.)

**३.** वादींच्या कथनानुसार दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही यातील वादी क्र.२ यांचे नावे असून त्यांनी (भु.विकास बँक) महाराष्ट्र लॅन्ड डेव्हलपमेंट बँक लिमिटेड, मुंबई यांचेकडून कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे भु.विकास बँक खातेदार असून इतर हक्कात वादी नं.२ यांचे नावे नोंद आहे.

**४.** वादींच्या कथनानुसार वाद मिळकत ही वादी क्र.२ याने त्यांची तीन मुले यांना समान हिश्याने वाटून दिली असुन वाद मिळकत ही मयत नवनाथ याचे हिश्यास दिली आहे. तसेच ती मिळकत वादी क्र.१ मालकी हक्काने वहिवाटून उत्पन्न घेत आहे. वादींच्या कथनानुसार वाद मिळकतीत उभा **८६०३२** या जातीचा अडसाली लागवडीचा सुमारे २५ कांडयावर ऊस उभा असून तो बारामती ॲग्रो साखर कारखान्यास जाणार होता. यास प्रतिवादींचा काहीही हक्क अगर अधिकार नव्हता.

**५.** वादींच्या कथनानुसार वाद मिळकत वादी क्र.१ याने मेहनत, मशागत करुन, लेव्हल करुन त्यात गाळ भरुन कसदार व सुपीक केलेली असून त्याची बांध बंधिस्ती करुन सुमारे चार लाख रुपये खर्च केला होता. वादी क्र.१ ही दावा मिळकतीत बागायती पिके घेत आहे. वादींच्या कथनानुसार वादी क्र.१ ही विधवा असुन, तिला सात लहान मुली आहेत. वादी क्र.२, वादी क्र.१ चा सासरा असुन तो वयस्कर आहे. वादींच्या असाहयतेचा फायदा घेण्याच्या वाईट हेतूने प्रतिवादी हे वादींच्या वाद मिळकती मधुन चालू ४ इंची पाईपलाईनमध्ये जबरदस्तीने हक्क सांगू लागला असल्याने प्रतिवादी यांची ५ इंची पाईपलाईन दावा मिळकतीमधून घेऊन जाण्यास वादींनी हरकत केल्यामुळे प्रतिवादी वाईट हेतूने वादींच्या असाहयतेमुळे ५ इंची पाईपलाईनचे दावा मिळकतीतून खोदकाम करुन पाईपलाईन नेणेसाठी प्रतिवादींचे अनाधिकाराचे कृत्य चालू केले आहे. वादींच्या कथनानुसार वादींनी प्रतिवादींना पाईपलाईन खोदकाम करताना दावा

मिळकतीमधून खोदकाम करण्याऐवजी दावा मिळकतीचे पश्चिम बाजूचे ओढयातून पाईपलाईन घेऊन जा असे म्हटले असता प्रतिवादींनी विनाकारण तहसिलदार करमाळा यांचेकडे खोटे अर्ज देऊन वादींना खर्चात पाडले. तसेच प्रतिवादींना वादींनी दिनांक १७/०७/२०२२ रोजी ओढयातून पाईपलाईन नेण्यास सांगितले. तेव्हा प्रतिवादींनी वादींच्या चालू पाईपलाईनवर हक्क सांगितला.

६. वादींच्या कथनानुसार प्रतिवादी आडमुठे व आडदांड आहे व त्यांच्या जवळ भरपूर मनुष्यबळ असुन वादींचा वाद मिळकती मधील उभा ऊस तोडून त्यातून जबरदस्तीने खोदकाम करुन प्रतिवादींना ओढयाने पाईप लाईन नेणेचा वाव असताना प्रतिवादींनी वादींच्या असाहयतेचा फायदा घेतला. तसेच प्रतिवादींचे असे कृत्य चालू राहिल्यास वादींच्या कायदेशीर मालकी हक्क वहिवाटीस बाधा येऊन दावा मिळकतीस मुकावे लागेल. त्यामुळे वादींवर अन्याय होईल व कधीही पैश्यात न भरून येणारे नुकसान होईल. म्हणून प्रतिवादींनी स्वतः अगर इतरांमार्फत वाद मिळकतीत घुसून उभ्या ऊसाच्या पिकाचे नुकसान करू नये याकरिता वादींनी निरंतर ताकिद प्रतिवादींविरूद्ध देण्यास विनंती केली आहे.

७. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादींनी निशाणी १९ वर त्यांचे लेखी जबाब दाखल केले. प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीची चर्तु:सिमा अंशतः बरोबर असल्याचे मान्य केले व इतर संपुर्ण मजकुर पुर्णपणे नाकारला.

८. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादींच्या मालकीची मौजे जिंती ग्रामपंचायत हद्दीमध्ये गट क्र.१४३/१ व १४३/२ ही शेत जमीन आहे. प्रतिवादींनी त्यांच्या जमीनीमध्ये बागायत करण्याच्या उद्देशाने सन २०१४ मध्ये उजनी जलाशय नाला गृप येथुन त्यांचे शेत जमीनीपर्यंत सुमारे ११,००० फुट लांबीची ४ इंची

पी.व्ही.सी. पाईपलाईन जमीन खाली अर्धा मीटर खोदून, गाढून पुर्ण केली होती व आहे. सदर पाईपलाईनचे पाणी वापरण्यासाठी उजनी जलाशयाच्या उपसासिंचन पाणी परवाना प्रतिवादींनी घेतला आहे. तसेच पाईपलाईनसाठी १२.५ एच.पी.विद्युत वीज कनेक्शन प्रतिवादींनी घेतलेला आहे.

९. प्रतिवादींच्या कथनानुसार वरील ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन ही उजनी जलाशय ते प्रतिवादींच्या शेत जमीन गट क्र.१४३/१ व १४३/२ मध्ये खोदुन नेत असताना सन २०१४ साली वादी यांच्या मालकीचे वाद मिळकतीत क्षेत्र असल्याने वादींनी प्रतिवादींना पाईपलाईन नेण्याकरिता तोंडी परवानगी दिली व प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीतुन क्षेत्रातुन पाईपलाईन जमीनीखालुन खोदुन, गाडुन नेलेली आहे.

१०. प्रतिवादींच्या कथनानुसार सद्य स्थितीत वाद मिळकतीमध्ये प्रतिवादींच्या मालकीची ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन वादी यांनी जुन २०२२ मध्ये फोडलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचे मालकीचे गट क्र.१४३/१ व १४३/२ मधील ऊसाचे पिक पाण्या अभावी जळुन चाललेले आहे व प्रतिवादींचे ५ ते ६ लाख रूपयांचे नुकसान झालेले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वादींच्या वाद मिळकतीत कोणतेही पीक नसताना सदरचे पाईपलाईन दुरूस्त करते वेळेस वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रतिवादींनी दिनांक ११/०७/२०२२ रोजी वादींना नोटीस पाठविली. परंतु प्रतिवादींनी नोटीस घेण्यास नकार दिल्यामुळे दिनांक १४/०७/२०२२ रोजी सदर नोटीसचा लिफाफा न बजावता प्रतिवादींना परत आला. प्रतिवादींच्या कथनानुसार दिनांक ११/०७/२०२२ ते वादींच्या वाद मिळकतीत पाईपलाईन दुरूस्त करण्यासाठी गेले असता वादींनी प्रतिवादींना शिवीगाळ करून दमदाटी केली व पाईपलाईन दुरूस्त

करण्यास विरोध केला. त्यामुळे प्रतिवादींना त्यांची पाईपलाईन दुरूस्त करता आलेली नाही.

**११.** प्रतिवादींच्या कथनानुसार तहसिलदार करमाळा यांच्याकडे पाईपलाईन दुरूस्त करण्याकरिता प्रतिवादी क्र.१ ने क्र. जमा–२/५/एस.आर/२/२०२२ नुसार दिनांक १९/०७/२०२२ रोजी अर्ज दिला. प्रतिवादींच्या कथनानुसार वादींनी सदर बाब न्यायालयापासून लपविली आहे. त्यामुळे वादी प्रतिवादींविरूदध निरंतर ताकिद मिळवण्यास पात्र नाही.

**१२.** प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ ने त्यांची शेत जमीन बागायत करण्याकरिता मौजे खातगाव हद्दीमधील नाला ग्रुप येथुन उपसासिंचन योजना अंतर्गत त्यांच्या मालकीचे शेत गट क्र.१५५ व १४३/२ पर्यंत पाईपलाईन टाकण्याचे ठरविले होते. त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ने उजनी जलाशयामधील नाला ग्रुप कडून सर्वे करून जवळचा लाईनलेआऊट काढलेला होता व प्रतिवादी क्र.२ यांच्या मालकीच्या उपसासिंचन पाईपलाईन ही वादी यांच्या मालकीच्या शेत जमीनीमधुन जात होती. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ने वादी यांना प्रत्यक्ष भेट्टुन प्रतिवादी क्र.२ ला पाईपलाईन खोदचारी घेऊन गाढण्याची असल्याबाबत सांगितले. त्यावेळी वादींनी तोंडी संमत्ती दिली होती.

**१३.** वादींच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ यांनी ५ इंची पी.व्ही.सी.पाईप खरेदी केले व उजनी जलाशयातील नाला ग्रुप येथुन त्यांच्या मालकीची गट क्र.१५५ व १४३/२ कडे पाईपलाईनसाठी खोदचारी खोदुन पाईप गाडण्याचे काम सुरू केले. प्रतिवादी क्र.२ ने जवळपास २००० फुट काम पुर्ण केलेले आहे. सदर काम वादींच्या

वाद मिळकत मधुन दिनांक ०१/०६/२०२२ रोजी चालु असताना वादींना प्रतिवादी क्र.२ ला पाईपलाईन खोदण्यास मजाव केला.

**१४.** प्रतिवादी क्र.२ च्या कथनानुसार सदर पाईपलाईन खोदण्यासाठी त्यांनी खाजगी बँकेकडुन जवळपास २० लाख रूपयाचे कर्ज घेतले होते. वादींनी अडीअडथळा केल्यामुळे प्रतिवादी क्र.२ चे कर्ज अडकलेले आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांनी ७०० फुट खोदचारी घेऊन ५ इंची व्यासाचे पी.व्ही.सी. पाईप गाढणे गरजेचे आहे. त्या अभावी प्रतिवादी क्र.२ ची पाईपलाईन पुर्ण होऊ शकत नाही. त्याकरिता प्रतिवादी क्र.२ ने पाणी परवाना व विद्युत परवाना घेतलेला आहे.

**१५.** प्रतिवादी क्र.२ च्या कथनानुसार त्यांनी वादींच्या वाद मिळकतीत अर्धा मीटर खोदचारी खोदण्याकरिता व पुर्ववत करण्याकरिता तयार आहेत. वादींच्या वाद मिळकतीत कोणतेही पीक नाही. त्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र.२ ला पाईपलाईन गाढण्यासाठी, खोदचारी खोदण्यासाठी अडथळा केल्याने प्रतिवादी क्र.२ ने नाईलाज तहसिलदार करमाळा यांच्याकडे पाईपलाईन खोदण्यासाठी अर्ज क्र. जमा–२/४९/एस.आर/३/२०२२ हा अर्ज दाखल केला.

**१६.** प्रतिवादींच्या कथनानुसार प्रथमदर्शनी केस ही वादींच्या बाजुने नसुन प्रतिवादींच्या बाजुने आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार न्यायाचा तराजु वादींच्या बाजुने नसुन प्रतिवादींच्या बाजुने आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वादींचा दावा नामंजुर केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादींचा दावा मंजुर केल्यास प्रतिवादींचे पैशात कधीही न भरून येणारे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे प्रतिवादींच्या वकिलांनी वादींचा दावा २५,०००/– रुपये खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

**१७.** वादी तर्फे विधीज्ञ श्री.ए.वाय.शिंपी यांचा तसेच प्रतिवादींतर्फे श्री. पी.बी.जाधव वकिल यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे तसेच लेखी जबाबाचे अवलोकन केले. तसेच दाव्यासोबत व लेखी जबाबासोबत वादी व प्रतिवादींनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. माझ्या पुर्वपीठासीन अधिकारी यांनी निशाणी ५० वर मुद्दे काढले होते. परंतु ते मुद्दे अपुरे असल्यामुळे निशाणी १ वर दिनांक २३/०६/२०२१ रोजी आदेश पारित करून निशाणी ५० नुसार अतिरिक्त मुद्दे काढण्यात आले होते. निशाणी ७७ वर वादींनी अतिरिक्त मुद्दयांवर व निशाणी ७८ वर प्रतिवादींनी अतिरिक्त मुद्दयांवर कोणताही अतिरिक्तचा पुरावा द्यायचे नसल्याबाबत पुरसीस दाखल केली. त्यामुळे खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण झालेले आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नमुद केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | वादी हे वाद मिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे सिद्ध करतात काय ? | होय. |
| **२.** | प्रतिवादींनी वादींच्या मालकी हक्कात व शांतमय कब्जात अडिअडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न केला काय ? | होय. |
| **३.** | वादी निरंतर मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहेत काय ? | होय |
| **४.** | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– : <u>कारणमिमांसा</u> :–**

**१८.** प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा सिध्द करण्याकरीता वादींतर्फे वादी क्र.२, मुकिंदा अनंता आरदड यांचा पुरावा पुरावा निशाणी ५१ नुसार नोंदविण्यात आला. वादींतर्फे साक्षीदार क्र.१ ने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या **आदेश १८ नियम ४** प्रमाणे त्याचे पुराव्याचे

शपथपत्र **निशाणी ५१** वर दिले. वादींनी त्यांच्या पुराव्यादरम्यान काही दस्तऐवजांवर विश्वास ठेवला. सदर दस्तऐवज योग्य वेळी न्यायनिर्णयामध्ये नमूद करण्यात येणार. वादींच्या वकीलांनी **निशाणी ५२** वर पुरसीस दाखल करून वादींचा पुरावा बंद केला.

**वादींच्या वकीलांनी विश्वास ठेवलेल्या कागदपत्रांची यादी–**

| अ.क्र. | दस्तऐवजांचे वर्णन | दस्तऐवजांचा दिनांक व शेरा | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | मौजे. खातगाव नं.१ येथील क.ग.नं.९९९ चा ७१९२ उतारा | २३/०६/२०२२ | ७० |

**१९.** प्रतिवादींतर्फे प्रतिवादी क्र.१ याला साक्षीदार क्र.१ म्हणुन निशाणी ५४ नुसार तपासण्यात आले. प्रतिवादी क्र.१ ने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या **आदेश १८ नियम ४** प्रमाणे त्याचे पुराव्याचे शपथपत्र **निशाणी ५४** वर दिले. प्रतिवादींनी त्यांच्या पुराव्यादरम्यान अनेक दस्तऐवजांवर विश्वास ठेवला. सदर दस्तऐवज योग्य वेळी न्यायनिर्णयामध्ये नमूद करण्यात येणार. प्रतिवादींच्या वकीलांनी **निशाणी ७६** वर पुरसीस दाखल करून प्रतिवादींचा पुरावा बंद केला.

**प्रतिवादींच्या वकीलांनी विश्वास ठेवलेल्या कागदपत्रांची यादी–**

| अ.क्र. | दस्तऐवज | निशाणी | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पाईपलाईन केस नं.क्र.जमा–२/४९/एस.आर–/२/२०२२ या प्रकरणाचा रोजनामा सत्यप्रत | ५७ | ०६/१२/२०२५ |
| २. | पाईपलाईन केस नं.क्र.जमा–२/४९/एस.आर/२/२०२२ या प्रकरणाचा अर्जाची सत्यप्रत | ५८ | ०६/१२/२०२५ |
| ३. | प्रतिवादी यांना वादी यांनी पाठविलेल्या नोटीसीची | ५९ | ११/०७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | सत्यप्रत | | |
| **४.** | प्रतिवादी यांना वादी यांनी अर्जास दिलेल्या लेखी म्हणण्याची सत्यप्रत | ६० | ०६/१२/२०२५ |
| **५.** | मा.तहसिलदार यांनी केलेला घटनास्थळ पंचनामा सत्यप्रत | ६१ | ०४/०२/२०२३ |
| **६.** | मा.तहसिलदार करमाळा यांचे पाईपलाईन एस.आर.नं.२/२०२२ चे निकालाची सत्यप्रत | ६२ | २२/०२/२०२३ |
| **७.** | मा. मंडल अधिकारी जिंती यांचा अहवाल | ६३ | ०४/०२/२०२३ |
| **८.** | पाईपलाईन केस नं. क्र.जमा–३/४९/एस.आर./३/२०२२ या प्रकरणाच्या रोजनाम्याची सत्यप्रत | ६४ | ०६/१२/२०२५ |
| **९.** | रोजी पाईपलाईन केस नं. क्र.जमा–३/४९/एस.आर/३/२०२२ या प्रकरणाची अर्जाची सत्य प्रत | ६५ | ०६/१२/२०२५ |
| **१०.** | रोजी यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे अर्जास दिलेल्या लेखी म्हणण्याची सत्यप्रत | ६६ | ०६/१२/२०२५ |
| **११.** | मा.तहसिलदार यांनी केलेला घटनास्थळ पंचनामा सत्यप्रत | ६७ | ०६/१२/२०२५ |
| **१२.** | मा.तहसिलदार करमाळा यांचे पाईपलाईन एस.आर.नं. ३/२०२२ चे निकालाची सत्यप्रत | ६८ | ०६/१५/२०२५ |
| **१३.** | मा. मंडल अधिकारी जिंती यांचा अहवाल | ६९ | ०६/१२/२०२५ |

**<u>वादींतर्फे श्री.ए.वाय.शिंपी वकील यांचा युक्तीवाद–</u>**

**२०.** वादींच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादात सांगितले की, प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या

कथनानुसार वादींनी वाद मिळकतीचे मशागत करून त्यातील उत्पन्नातून त्यांचे उदरनिर्वाह करीत आहेत. वादींच्या वाद मिळकतीतून प्रतिवादी ४ इंची पाईपलाईनमध्ये जबरदस्ती हक्क सांगत असल्यामुळे तसेच प्रतिवादींची ५ इंची पाईपलाईन दावा मिळकतीतून घेवून जाण्याकरीता वादींनी हरकत घेतल्यामुळे वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केलेला आहे. वादींच्या कथनानुसार दिनांक १७/०६/२०२२ रोजी वादींनी प्रतिवादींना ओढयातून त्यांची पाईपलाईन घेवून जाण्यासाठी सांगितले असता प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीतून पाईपलाईन टाकण्याचा हक्क सांगत असल्यामुळे वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केला. वादींच्या वकीलांनी वादी हे वाद मिळकतीचे मालक व ताबेदार असल्यामुळे प्रतिवादींना वादींच्या वाद मिळकतीत हरकत व अडीअडथळा करण्याचा कोणताही अधिकार नसल्यामुळे त्यांनी प्रतिवादींविरूध्द त्यांनी वादींच्या वाद मिळकतीत उभे असलेल्या ऊस पिकाचे नुकसान करू नये. तसेच वादींच्या वाद मिळकतीतून खोदकाम करून नुकसान करू नये म्हणून त्यांनी प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद देण्याचा युक्तीवाद केला. वादींच्या वकीलांनी प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने असून न्यायाचा तराजूसुध्दा वादीच्या बाजूने असल्याचा युक्तीवाद केला. तसेच निरंतर मनाई हुकूमाचा आदेश दिला नाहीतर वादींचे अपरिमानीत नुकसान होवून त्यांना वाद मिळकतीच्या हक्कावरून मुकावे लागेल म्हणून त्यांनी प्रस्तुत दावा मंजूर करण्याची विनंती केली.

**<u>प्रतिवादींतर्फे श्री. पी.बी.जाधव वकील यांचा युक्तीवाद–</u>**

२१. प्रतिवादींच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादात सांगितले की, वादींनी प्रतिवादींविरूध्द खोटा व चुकीचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी त्यांच्या मालकीची मिळकत गट क्र.१४३/१ व १४३/२ मधील शेतजमीन बागायत करण्याच्या

उद्देशाने सन २०१४ मध्ये उजनी जलाशयातील नाला गृप येथून त्यांच्या शेतापर्यंत सुमारे ११,०००/– फुट लांबीची ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन जमीनीखाली अर्धा मीटर खोदून गाढून पूर्ण केली आहे व ती पाईपलाईन सन २०१४ मध्ये वादींच्या तोंडी संमतीमुळे वाद मिळकतीतून घेण्यात आलेली होती. जून २०२२ मध्ये वादींनी प्रतिवादींच्या ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन फोडली होती. त्यामुळे प्रतिवादींना त्यांच्या मालकीचे गट क्र. १४३/१ व १४३/२ या मिळकतीतील ऊसाचे पिक पाण्याआभावी जळून गेले असल्याचे कथन केले. त्यामुळे प्रतिवादींचे पाच ते सहा लाख रूपयांचे नुकसान झाले. प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांना वाद मिळकतीतून फोडलेली पाईपलाईन दुरूस्त करण्याकरीता दिनांक ११/०७/२०२२ रोजी वादींना नोटीस पाठविली. परंतु वादींनी ती घेण्यास नकार दिल्यामुळे दिनांक १४/०७/२०२२ रोजी पोष्टाची नोटीस प्रतिवादींना परत मिळाल्याचा युक्तीवाद केला. तसेच दिनांक १७/०७/२०२२ रोजी प्रतिवादी वाद मिळकतीचे पाईपलाईन दुरूस्त करण्यास गेले असता वादींनी प्रतिवादींना शिवीगाळ करून पाईपलाईन दुरूस्त करण्यास विरोध केला. त्यामुळे प्रतिवादींना पाईपलाईन दुरूस्त करता आली नाही.

**२२.** प्रतिवादींच्या वकीलांनी पुढे त्यांच्या युक्तीवादात दिनांक १९/०७/२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी तहसिलदार, करमाळा यांच्याकडील प्रकरण क्र.जमा–२/५/एस आर/२/२२ व प्रकरण क्र.२/४९ /एस आर/३/२२ हे प्रकरण महाराष्ट्र जमीन महसूल संहिताच्या कलम ४९ प्रमाणे दाखल केले असून तहसिलदारांनी वादींना वाद मिळकतीतून प्रतिवादींना पाईपलाईन दुरूस्त करण्याचे अंतिम आदेश दिनांक २२/०७/२०२२ रोजी दोन्ही प्रकरणामध्ये पारीत केले

असल्यामुळे वादींनी प्रस्तुतचा खोटा व चुकीचा दावा दाखल केल्यामुळे त्यांनी प्रस्तुत दावा खारीज करण्याची विनंती केली.

**२३.** प्रतिवादींच्या वकीलांनी पुढे त्यांच्या युक्तीवादात वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आला नसून वादींनी तहसिलदार, करमाळा यांच्यासमक्ष झालेल्या प्रकरणाची वस्तुस्थिती न्यायालयासमक्ष लपवून ठेवली असल्यामुळे वादी न्यायसंगत दाद मिळविण्यास पात्र नसल्याचा युक्तीवाद केला. प्रतिवादींच्या वकीलांनी वादींच्या बाजूने प्रथमदर्शनी केस नसून न्यायाचा तराजूसुध्दा वादींच्या बाजूने नसून जर वादींचा दावा मंजूर केला तर, प्रतिवादींना त्यांच्या शेतात पाण्याअभावी पिक पेरता येणार नसल्यामुळे प्रतिवादींचे अपरिमानीत नुकसान होणार असल्यामुळे त्यांनी वादींचा दावा विशेष खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

## <u>मुद्यांची कारणे</u>

### <u>मुद्या क्र.१ ची कारणे–</u>

**२४.** वादींच्या कथनानुसार मौजे खातगांव क्र.१ ता.करमाळा जि.सोलापूर येथे वादींची क.ग.नं.१११ पश्चिम पैकी ०हे.८४ आर, पोटखराब ०हे २३ आर, आकार रू. व पैसे ००.७५ एकूण ०१ हेक्टर ०७ आर मिळकतीचे वादी मालक व ताबेदार असल्याचे नमूद केलेले आहे. सदरची बाब सिध्द करण्याकरीता वादीने निशाणी ०४ वर दस्त क्र. ७० वर वाद मिळकतीची ७/१२ उता–याची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. निशाणी ७० चे अवलोकन केले असता वादी क्र.२ चे नाव इतर हक्कात असून भोगवटदार वर्गात दि.महाराष्ट्र लॅन्ड डे बॅंक लि. मुंबई शाखा सोलापूर यांचे नाव नमूद केलेले आहे. वादी क्र.२ ने त्याच्या शेतात ऊस पिकाची पेरणी करण्याकरीता सदर

बँकेकडून कर्ज घेतले होते व वाद मिळकत गहाण ठेवली होती. त्यामुळे वादी क्र.२ चे नाव इतर हक्कात नमूद केलेले आहे.

**२५.** प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ७३ वर वादींच्या ७/१२ उता–याची दिनांक १२/०३/२०२६ रोजीची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. निशाणी ७३ चे अवलोकन केले असता दिसून येते की, वाद मिळकतीच्या ७/१२ उता–यातून दि महाराष्ट्र लॅन्ड डे बँक लि. मुंबई शाखा सोलापूर यांचे नाव भोगवटदार वर्गातून कमी करून त्या ठिकाणी वादी क्र.२ यांचे नाव टाकण्यात आलेले आहे. सदर वादी क्र.२ ची नोंद महाराष्ट्र लॅन्ड डे बँक चे नाव फेर क्र.२७७२ नुसार कमी करण्यात आले असल्याचे दिसून येते. प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ७४ वर फेर क्र.२७७२ ची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, दिनांक २०/०६/२०२३ रोजीच्या पत्रानुसार मा.निवासी उपजिल्हा अधिकारी, सोलापूर यांच्या आदेशान्वये वादींचे संपूर्ण कर्ज माफी करण्यात आले असून सदर बँकेचे नाव काढून वादीच्या नावाची नोंद ७/१२ उता–यामध्ये झालेली आहे. त्यामुळे वरील निशाणी ७०, निशाणी ७३, निशाणी ७४ च्या नोंदीवरून वादी हे वाद मिळकतीचे भोगवटदार वर्ग–१ चे धारक असून वाद मिळकत ही वादींच्या मालकी व ताब्यातील आहे. सदर बाब मोडून काढण्याकरीता प्रतिवादींनी कोणतेही इतर दस्त अभिलेखावर दाखल केले नसल्यामुळे वादी वाद मिळकतीचे मालक व ताबेदार असल्याचे निष्पन्न होते. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ ची कारणे–</u>**

**२६.** वादींच्या कथनानुसार प्रतिवादी वादींच्या वाद मिळकतीत ४ इंची पाईपलाईनमध्ये जबरदस्ती हक्क व अधिकार सांगत आहेत. तसेच प्रतिवादी वादींच्या

वाद मिळकतीत ५ इंची पाईपलाईन दावा मिळकतीतून टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळे वादींनी त्याला आडविले असता प्रतिवादींना दिनांक ११/०७/२०२२ रोजी वादींच्या वाद मिळकतीच्या पश्चिम बाजूस ओढयातून पाईपलाईन घेवून जाण्यसाठी सांगितले असता प्रतिवादींनी वादींच्याच वाद मिळकतीतून पाईपलाईन घेवून जाण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केले असल्याचे कथन केले.

२७. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रतिवादींनी त्यांच्या मालकीची गट क्र. १४३/१ व १४३/२ या मिळकतीमध्ये सन २०१४ मध्ये उजनी जलाशयातील नाला गृह येथून त्यांच्या शेतजमीनीपर्यंत ११,०००/– फुट लांबीची ४ इंची पी.व्ही.सी. पाईपलाईन जमीनीखाली अर्धा इंच खोदून गाढून पूर्ण केल्याचे कथन केले. तसेच त्याकरीता प्रतिवादींना उजनी जलाशयाच्या उपसिंचन पाणी परवानासुध्दा तसेच १२.५ एच. पी. विदयुत पंपाचे विज कनेक्शन देखील प्रतिवादींनी घेतले असल्याचे कथन केले. प्रतिवादींच्या कथनानुसार सदर पाईपलाईन वाद मिळकतीतून टाकण्याकरीता वादींनी तोंडी संमती दिली होती.

२८. प्रतिवादींच्या कथनानुसार जून २०२२ मध्ये वादींनी प्रतिवादींचे पाईपलाईन मोडली. त्यामुळे वादींनी प्रतिवादींना दिनांक ११/०७/२०२२ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठवून पाईपलाईन दुरूस्त करण्यास परवानगी मागितली असल्याचे नमूद केले. तसेच सदर नोटीस दिनांक १४/०६/२०२२ रोजी वादींनी घेण्यास नकार दिल्यामुळे रजिष्टर पोष्टाचा लिफाफा न बजावता प्रतिवादींना परत आला. त्यानंतर दिनांक १७/०७/२०२२ रोजी प्रतिवादींनी वाद मिळकतीत जावून पाईपलाईन दुरूस्त करण्याचा प्रयत्न केले असता वादींनी अडीअडथळा व हरकत

निर्माण केली. त्यामुळे प्रतिवादींना पाईपलाईन दुरूस्त करता आली नाही व प्रतिवादींच्या शेतातील ऊसाचे पिक जळून प्रतिवादींचे पाच ते सहा लाख रूपयांचे नुकसान झाले असल्याचे कथन केले. सदरची बाब सिध्द करण्याकरीता प्रतिवादींनी निशाणी ५९ वर पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. परंतु प्रतिवादींच्या वकीलांनी नोटीस परत आल्याचा मूळ लिफाफा व पोष्टाची पावती तसेच पोहोच पावती अभिलेखावर दाखल केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या वकीलांनी कथन की सदर नोटीस वादीने घेण्यास नकार दिला व नोटीस वादींना न बजावता परत मिळाली ही बाब विश्वासनीय नाही. सदर नोटीस परतीचा लिफाफा, पोष्टाची मूळ पावती प्रतिवादींनी का दाखल केली नाही याकरीता प्रतिवादींनी कोणतेही कारण दिलेले नाही. तसेच वादींनी प्रतिवादींना नोटीस दिल्याचे नकार दिले.

**२९.** वादींच्या कथनानुसार दिनांक १७/०७/२०२२ रोजी वाद मिळकतीत प्रतिवादींनी वादींच्या ४ इंची पाईपलाईनवर जबरदस्ती हक्क सांगून वादींच्या वाद मिळकतीतून ५ इंची पाईपलाईन टाकण्याचा प्रयत्न केल्यामुळे तसेच वादींनी प्रतिवादींना वाद मिळकतीच्या पश्चिम बाजूने ओढयातून पाईपलाईन नेण्याकरीता सांगितले असता वादींनी वादींच्या पाईपलाईनवर हक्क व अधिकार सांगून अडीअडथळा केल्यामुळे वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीदीचा दाखल केले असल्याचे नमूद केले आहे.

**३०.** याउलट प्रतिवादींच्या कथनानुसार त्यांनी सन २०१४ मध्ये वादींच्या वाद मिळकतीतून त्यांचे गट क्र. १४३/१ व १४३/२ मधून पाईपलाईन टाकली असता वादींनी तोंडी परवानगी दिली होती व जून २०२२ मध्ये वादींनी प्रतिवादींची पाईपलाईन मोडली असल्यामुळे दिनांक १७/०७/२०२२ रोजी प्रतिवादींनी मोडलेली पाईपलाईन

दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला असता वादींनी प्रतिवादींना अडीअडथळा व हरकत निर्माण केले असल्याचे नमूद केले आहे.

३१. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम ०१ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे. सदर तरतूद खालीलप्रमाणे आहे–

**ORDER XXXIX**

***TEMPORARY INJUNCTIONS AND INTERLOCUTORY ORDERS***

***Temporary injunctions***

*1. Cases in which temporary injunction may be granted.– Where in any suit it is proved by affidavit or otherwise–*

*(**a**) **that any property in dispute in a suit is in danger** of being wasted, **damaged** or alienated by any party to the suit, or wrongfully sold in execution of a decree, or*

*(**b**) that the defendant threatens, or intends,to remove or dispose of his property with a view to (defrauding) his creditors,*

*(**c**) that the defendant threatens to dispossess the plaintiff or otherwise **cause injury to the plaintiff** in relation **to any property in dispute in the suit,** the Court may by order grant a temporary injunction to restrain such act, or make such other order for the purpose of staying and **preventing** the wasting, **damaging**, alienation, sale, removal or disposition of the property (or dispossession of the plaintiff, or otherwise causing injury to the plaintiff in relation to any property in dispute in the suit) as the Court thinks fit, until the disposal of the suit or until further orders.*

३२. तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा आदेश कसा देता येणार हा विशिष्ट मदत कायदा, १९६३ च्या कलम ३६ मध्ये दिला असून तात्पुरता व कायम मनाई हुकूम कसा देता येणार हे निशाणी ३७ मध्ये दिला असून कायमचा मनाई हुकूम कधी देता येणार हे कलम ३८ मध्ये नमूद केलेले आहे. सदर कलम ३६ ते ३८ अवलोकन करीता खालीलप्रमाणे नमूद करण्यात येते–

*36. **Preventive relief how granted–** Preventive relief is granted at the discretion of the Court by injunction, temporary or perpetual.*

*37. **Temporary and perpetual injunctions–***

*(1) Temporary injunctions are such as are to continue until a specified time, or until the further order of the Court, and they may be granted at any stage of a suit, and are regulated by the Code of Civil Procedure, 1908 (5 of 1908) .*

*(2) A perpetual injunction can only be granted by the decree made at the hearing and upon the merits of the suit; the defendant is thereby perpetually enjoined from the assertion of a right, or from the commission of an act, which would be contrary to the rights of the plaintiff.*

*38.**Perpetual injunction when granted–***

*(1) Subject to the other provisions contained in or referred to by this Chapter, a perpetual injunction may be granted to the plaintiff to prevent the breach of an obligation existing in his favour, whether expressly or by implication.*

*(2) When any such obligation arises from contract, the Court shall be guided by the ruled and provisions contained in Chapter II.*

*(3) When the defendant invades or threatens to invade the plaintiff's right to, or enjoyment of, property, the Court may grant a perpetual injunction in the following cases, namely:–*

*(a) where the defendant is trustee of the property for the plaintiff;*

*(b) where there exists no standard for ascertaining the actual damage caused, or likely to be caused, by the invasion;*

*(c) where the invasion is such that compensation in money would not afford adequate relief;*

*(d) where the injunction is necessary to prevent a multiplicity of judicial proceedings.*

**३३.** वादींने निशाणी ५१ वर स्वत:चा पुरावा दिला असून प्रतिवादींच्या वकीलांनी वादीला उलटतपासात दिलेले सुझाव की, सन २०१४ मध्ये वादींनी प्रतिवादींना वाद मिळकतीतून पाईपलाईन टाकण्याकरीता तोंडी संमती दिली असल्याचे वादींनी नाकारले. तसेच सन २०१४ मध्ये प्रतिवादींना त्यांच्या गट क्र. १४३/१ व १४३/२ मध्ये उजनी जलाशयापासून त्यांच्या शेतापर्यंत पाईपलाईन केली असल्याचे वादींनी नाकारले. वादींनी दिनांक ११/०७/२०२२ रोजी प्रतिवादींनी पाईपलाईन दुरूस्त करण्याची नोटीस दिली असल्याचे व ती वादींनी घेण्यास नकार दिला असल्याचे नाकारले. तसेच दिनांक १७/०७/२०२२ रोजी प्रतिवादींनी वाद मिळकतीत पाईपलाईन दुरूस्त करण्याचा प्रयत्न केला असता वादींनी प्रतिवादींना शिवीगाळ करून शेतातून हाकलून दिले असल्याचे नाकारले. प्रतिवादींचे कथन की, त्यांनी त्यांच्या शेतात पाईपलाईन टाकण्याकरीता २० लाख रूपयाचे कर्ज घेतले असल्याचे व वादींच्या

पाईपलाईन फोडल्यामुळे प्रतिवादींच्या पिकाचे ५ ते ७ लाख रूपयाचे नुकसान झाले असल्याचे वादींनी नाकारले.

**३४.** वादींच्या वकीलांनी प्रतिवादी क्र.१ च्या उलटतपासात त्यांच्या शेताच्या क्षेत्रापासून इतर लोकांनी त्यांच्या शेतामध्ये पाणी घेण्याकरीता गायरान क्षेत्रातून पाईपलाईन केली असल्याचे मान्य व कबूल केले. तसेच प्रतिवादी क्र.१ ला सुध्दा गायरान क्षेत्रातून त्याच्या शेतात पाईपलाईन करता आली असल्याचे त्यांनी मान्य व कबूल केले. प्रतिवादी क्र.१ ने पुढे त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, वादीच्या क्षेत्रात पिक उभे असताना वादीच्या क्षेत्राचे नुकसान व्हावे म्हणून पाईपलाईन घेण्याकरीता त्यांनी तहसिलदार, करमाळा यांच्याकडे अर्ज दिला होता. पुढे वादींनी उलटतपासात सांगितले की, त्यावेळी वादींच्या वाद मिळकतीत ऊसाचे पिक नव्हते. परंतु प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ६१ व निशाणी ६७ वर दाखल केलेल्या पंचनाम्याचे अवलोकन केले असता त्यावेळी वादीच्या क्षेत्रात ऊसाचे पिक उभे असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे वादींना प्रतिवादींच्या अडीअडथळा व हरकत पासून त्याची वाद मिळकतीचे संरक्षण करण्याचा व जपण्याचा संपूर्ण अधिकार आहे.

**३५.** दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम ०१ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम जर एखादी मिळकत धोक्यात किंवा त्या मिळकतीचे नुकसान होणार असेल तर अशा परिस्थितीमध्ये दावा दाखल करून तुर्तातुर्त मनाई हुकूमाची दाद मागता येणार असल्याचे दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ३९ नियम ०१ अ मध्ये दिलेले आहे. ते खालीलप्रमाणे आहे–

*(**a**) **that any property in dispute in a suit is in danger** of being wasted, **damaged** or alienated by any party to the suit, or wrongfully sold in execution of a decree.*

**३६.** वादींच्या कथनानुसार दिनांक ११/०७/२०२२ रोजी प्रतिवादींनी त्यांच्या वाद मिळकतीत पाईपलाईनवर हक्क व अधिकार दाखविण्याचा प्रयत्न केल्यामुळे वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द दाखल केलेला आहे. त्यामुळे विशिष्ट मुदतीचा कायदा १९६३ कलम ३६ ते ३८ नुसार विशेषत: कलम ३८(३) नुसार जेव्हा प्रतिवादींनी वादींच्या क्षेत्रात पाईपलाईन टाकण्याचा किंवा हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न वादींच्या मिळकत वापरण्याच्या अधिकाराला हक्क व बाधा येत असेल तर अशा परिस्थितीमध्ये वादींला प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मागण्याचा अधिकार असल्याचे नमूद केले आहे. विशिष्ट मुदतीचा कायदा १९६३ कलम ३८ (३) मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

*(3) When the **defendant invades or threatens to invade** the **plaintiff's right to, or enjoyment of, property**, the **Court may grant a perpetual injunction** in the following cases, namely:–*

*(b) where there exists no standard for ascertaining the actual damage caused, or likely to be caused, by the invasion;*

*(c) where the invasion is such that compensation in money would not afford adequate relief;*

*(d) where the injunction is necessary to prevent a multiplicity of judicial proceedings.*

**३७.** त्यामुळे वरील कलमाचे अवलोकन केले असता प्रतिवादींच्या कृत्यामुळे वादींला वादींच्या वाद मिळकतीच्या उपभोग घेण्याच्या अधिकारास बाधा निर्माण होत असल्यामुळे वादींला प्रतिवादींविरूध्द प्रस्तुत दावा दाखल करण्याचा अधिकार आहे. तसेच प्रतिवादींनी वादीने सन २०१४ मध्ये पाईपलाईन टाकण्याकरीता तोंडी संमती दिली होती ही बाब सिध्द केलेली नाही. तसेच वादींनी जून २०२२ मध्ये प्रतिवादींची पाईपलाईन मोडून प्रतिवादींच्या शेतात असलेल्या पाण्याच्या प्रवाहात अडीअडथळा निर्माण करून प्रतिवादींच्या शेतातील ऊस पिक पाण्याच्या अभावामुळे जळून प्रतिवादींचे ५ ते ६ लाख रूपयाचे नुकसान झाले ही बाब प्रतिवादींनी सिध्द केलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीत अडीअडथळा करून दिनांक १७/०७/२०२२ रोजी ४ इंची तसेच ५ इंची पाईपलाईन टाकण्याचा प्रयत्न करून वादींच्या वाद मिळकतीच्या अधिकारास अडीअडथळा केल्यामुळे वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मिळविण्यास पात्र आहे. त्यामुळे वरील ओहापोहवरून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.३ ची कारणे–</u>**

**३८.** प्रतिवादींच्या कथनानुसार वादी स्वच्छ हाताने न्यायालयासमक्ष आला नसून वादीने सत्य परिस्थिती न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. प्रतिवादींच्या कथनानुसार वादीने दिनांक १७/०७/२०२२ रोजी वादीने प्रतिवादींना वाद मिळकतीतील पाईपलाईन दुरूस्त करण्यास हरकत केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ने दिनांक १९/०७/२०२२ रोजी तहसिलदार, करमाळा यांच्याकडे पाईपलाईन दुरूस्ती करण्याकामी प्रकरण क्र.जमा–२/५/एस आर/२/२२ हा अर्ज दिनांक १९/०७/२०२२ रोजी दाखल केला. तसेच प्रतिवादी क्र.२ ने दिनांक

११/०७/२०२२ रोजी पाईपलाईन परवानगी अर्ज क्र.३/२२ दाखल केला व दिनांक २२/०२/२०२२ रोजी तहसिलदार, करमाळा यांनी वरील दोन्ही प्रकरणामध्ये प्रतिवादींच्या बाजूने निकाल देवून प्रतिवादींना वादींच्या मिळकतीत मिळकत क्र.१४३/१ व १४३/२ मध्ये असलेली पाईपलाईन वादींच्या वाद मिळकतीमध्ये पाईपलाईन दुरूस्त करण्याची परवानगी अटी व शर्तीवर दिली असल्याचे नमूद केले. सदरची बाब सिध्द करण्याकरीता प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ५६ वर एकूण १३ दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले. प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ५७ वर प्रकरण क्र.२/२२ च्या रोजनाम्याची प्रत, निशाणी ५८ वर प्रतिवादी क्र.१ ने वादींविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४९ (२)(७) प्रमाणे दिलेल्या अर्जाची छायांकित प्रत, निशाणी ५९ वर वादीचे प्रतिवादींना दिलेली नोटीस, निशाणी ६० वर प्रतिवादींनी म्हणजेच प्रस्तुत वादी क्र.१ व २ व इतर दोन लोकांनी दिलेला जबाब, निशाणी ६१ वर मंडल अधिकारी यांनी केलेला पंचनाम्याची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. तसेच निशाणी ६२ वर दिनांक २२/०२/२०२२ रोजी प्रकरण क्र.२/२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी निशाणी ६३ वर मंडल अधिकारी यांनी तहसिलदार यांना पाठविलेल्या अहवालाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे.

**३९.** प्रतिवादींच्या वकीलांनी पुढे निशाणी ६५ वर प्रतिवादी क्र.२ ने पाईपलाईन परवानगी अर्ज क्र.३/२२, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४९ प्रमाणे दिलेला अर्ज छायांकित प्रत, निशाणी ६६ वर सामनेवाला म्हणजेच वादींनी दिलेल्या जबाबाची प्रत, निशाणी ६७ वर मंडल अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रमाणित प्रत, निशाणी ६८ वर तहसिलदार, करमाळा यांनी दिनांक

२२/०२/२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशाची प्रमाणित प्रत व निशाणी ६९ वर मंडल अधिकारी यांनी तहसिलदार, करमाळा यांना दिलेल्या अहवालाची प्रमाणित प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. याउलट वादींच्या वकीलांनी प्रतिवादींच्या उलटतपासात त्यांनी भूविकास बँक यांना तहसिलदार यांच्यासमक्ष केलेल्या प्रकरणामध्ये पक्षकार केले नसल्याची बाब अभिलेखावर आणली आहे. तसेच निशाणी ६१ व निशाणी ६७ च्या पंचनाम्यावर वादी व प्रतिवादींची सही नसल्याची बाब अभिलेखावर आणलेली आहे. तसेच तहसिलदार यांनी पारीत केलेल्या आदेशावरील अटी व शर्तीचे प्रतिवादींनी पालन केले नसल्याची बाब अभिलेखावर आणलेली आहे.

**४०.** इथे नमूद करणे अत्यंत गरजेचे आहे की, वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द निरंतर ताकीद मिळण्याकरीता विशिष्ट मुदतीच्या कायदा, १९६३ च्या कलम ३८ नुसार दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी वादींविरूध्द दाखल केलेले प्रकरण क्र. जमा २/५/एस आर/२/२२ व प्रकरण क्र.जमा २/४९ एस आर/३/२२ हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिताच्या कलम ४९ अन्वये दाखल केलेले आहे. त्यामुळे सदर कलमचे अवलोकन करणे गरजेचे आहे. कलम ४९ मधील खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

***Section** 49–**Construction of water course through land belonging to other person**.*

*(1) If any person (hereinafter called “the applicant”) desires to construct a water course to take water to irrigate his land for the purpose of agricultural from a source of water to which he is entitled (including any source of water belonging to Government from which water is permitted to be taken) but such water course is to be*

*constructed through any land which belongs to or is in possession of another person (hereinafter called "the neighbouring holder"), an if no agreement is to be arrived at for such construction between the applicant and the neighbouring holder, the person desiring to construct the water course may make an application in the prescribed form to the Tahsildar.*

*Explanation – For the purposes of this section, the neighbouring holder includes the person to whom the land belongs and all persons holding through or under him.*

*(2) On receipt of the application, if the Tahsildar after making an enquiry and after giving the neighbouring holder and all other persons interested in the land, an opportunity of stating any objection to the application, is satisfied that for ensuring the full and efficient use for agriculture of the land belonging to the applicant it is necessary to construct the water course, he may by order in writing, direct the neighbouring holder to permit the applicant to construct the water course on the following conditions:–*

*(i) The water course shall be constructed through such land in such direction and by manner as is agreed upon by the parties, or failing agreement, as directed by the Tahsildar, so as to cause as little damage to the land through which it is constructed, as may be possible.*

*(ii) Where the water course consists of pipes laid under of over the surface, it shall, as far as possible, be along the shortest distance*

*through such land, regard being had to all the circumstances of the land of the neighbouring holder. Where the water course consists of underground pipes, the pipes shall be laid at a depth not less than half a metre from the surface of the land.*

*(iii) Where the water course consists of a water channel, the width of the channel shall not be more than is absolutely necessary for the carriage of water, and in any case shall not exceed one and one–half metres.*

*(iv) The applicant shall pay to the neighbouring holder–*

*(a) such compensation for any damage caused to such land by reason of the construction of any water course injuriously, affecting such land; and*

*(b) such annual rent as the Tahsildar may decide to be reasonable in cases where the water course consists of a water channel and pipes laid over the surface; and where it consists of underground pipes, say, at a rate of 25 paise for every ten metres or a fraction thereof for the total length of land under which the underground pipe is laid.*

*(v) The applicant shall maintain the water course in a proper state of repair.*

*(vi) Where the water course consists of underground pipes, the applicant shall–*

*(a) cause the underground pipe to be laid with the least practicable delay; and*

*(b) dig up no more land than is reasonably necessary for the purpose of laying the underground pipe and any land so dug up shall be filled in, reinstated and made good by the applicant at his own cost for use by the neighbouring holder.*

*(vii) Where the applicant desires to lay, repair or renew the pipe, he shall do so after reasonable notice to the neighbouring holders of his intention so to do and in so doing shall cause as little damage as possible to the land or any crops standing thereon,*

*(viii) Such other conditions as the Tahsildar may think fit to impose.*

*(3) An order made under sub-section (2) shall direct how the amount of compensation shall be apportioned among the neighbouring holders and all persons interested in the land.*

*(4) Any order made under sub-section (2) shall be final and be a complete authority to him or to any agent or other person employed by him for the purpose to enter upon the land specified in the order with assistants or workmen and to do such work as may be necessary for the construction of the water course and for renewing or repairing the same.*

*(5) If the applicant in whose favor an order under sub-section(2) is made–*

*(a) fails to pay the amount of compensation or the amount of rent, it shall be recovered as an arrear of land revenue, on*

*an application being made to the Tahsildar by the person entitled thereto;*

*(b) fails to the maintain the water course in a proper state of repairs, he shall be liable to pay such compensation as may be determined by the Tahsildar for any damage caused on account of such failure.*

*(6) If a person intends to remove or discontinue the water course constructed under the authority conferred on him under this section, he may do so after giving notice to the Tahsildar and the neighbouring holder.*

*In the event of removal or discontinuance of such water course, the person taking the water shall fill in and reinstate the land at his own cost with the least practicable delay. If he fails to do so, the neighbouring holder may apply to the Tahsildar who shall require such person to fill in and reinstate the land.*

*(7) The neighbouring holder or any person, on his behalf shall have the right to the use of any surplus water from the water course on payment of such rated as may be agreed upon between the parties, and on failure of agreement, as may be determined by the Tahsildar. If a dispute arises whether there is or is no surplus water in the water course, it shall be determined by the Tahsildar, and his decisions shall be final.*

*(8)* ***There shall be no appeal from any order passed by a Tahsildar under this section. But the Collector may call for and***

***examine the record of any case and if he considers that the order passed by the Tahsildar is illegal or improper, he may, after due notice to the parties, pass such order as he deems fit***.

*(9)* ***The orders passed by the Tahsildar or Collector under this section shall not be called in question in any Court***.

*(10) Where any person, who after a summary inquiry before the Collector or a Survey Officer, Tahsildar or Naib-Tahsildar is prover to have willfully injured or damaged any water course duly constructed or laid under this section, he shall be liable to a fine not exceeding one hundred rupees every time for the injury or damage so caused.*

**४१.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिताच्या कलम ४९ (९) प्रमाणे तहसिलदार किंवा जिल्हाधिकारी यांनी पारीत केलेला निशाणी ४९ मधील आदेश कोणत्याही न्यायालयासमक्ष आव्हानित करता येणार नसल्याची तरतूद केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादींचे कथन की वादींनी सत्य परिस्थिती लपवून प्रस्तुतचा दावा दाखल केला असून तहसिलदार करमाळा यांच्यासमक्ष झालेल्या कारवाई संदर्भात वादींनी काही नमूद केले नसल्याची बाब गृहीत धरण्यासारखी नाही. तसेच तहसिलदार यांनी प्रतिवादींचा अर्ज निकाली काढताना कायदेशीर प्रक्रियेचे पालन केले किंवा नाही त्याकरीता वादींच्या वकीलांनी प्रतिवादी क्र.१ ला उलटतपासात विचारलेले प्रश्न की, तहसिलदार यांनी वादींना नोटीस दिली नव्हती, तसेच भुविकास बँकला पक्षकार केले नव्हते व निशाणी ६१ व निशाणी ६७ च्या पंचनाम्यावर वादींची व प्रतिवादींची सही नाही ही सर्व बाब कलम ४९ (९) च्या बाधेमुळे विचारात घेण्यासारखी नाही.

**४२.** दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९ प्रमाणे दिवाणी न्यायालयाला दिवाणी स्वरूपाची सर्व दावे चालविण्याचे अधिकार आहेत. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९ मध्ये नमूद केलेली तरतूद खालीलप्रमाणे आहे–

***PART I***

***SUITS IN GENERAL***

***Jurisdiction of the Courts and res judicata***

***Section** 9 **– Courts to try all civil suits unless barred–***

*The Courts shall (subject to the provisions herein contained) have jurisdiction to try all suits of a civil nature excepting suits of which their cognizance is either expressly or impliedly barred.*

***Explanation– (I)–** A suit in which the right to property or to an office is contested is a suit of a civil nature, notwithstanding that such right may depend entirely on the decision of questions as to religious rites or ceremonies.*

***Explanation II–** For the purposes of this section, it is immaterial whether or not any fees are attached to the office referred to in Explanation I or whether or not such office is attached to a particular place.*

**४३.** प्रस्तुत दावा वादींनी प्रतिवादींविरूध्द निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला असून सदर दावा वरील कलम ९ प्रमाणे या न्यायालयाला चालविण्याचे अधिकार आहे. वादींनी प्रतिवादींना दिनांक १६/०७/२०२२ रोजी वादींच्या वाद मिळकतीतून पाईपलाईन टाकण्याचा प्रयत्न केले असता वादींनी वाद मिळकतीच्या पश्चिमेस

असलेल्या ओढयातून पाईपलाईन नेण्यास सांगितले असता प्रतिवादींनी वादींच्या वाद मिळकतीवर हक्क व अधिकार दाखविण्याचा प्रयत्न केले असता वादींनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरूध्द आणला असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी केलेल्या कृत्यामुळे वादींच्या हक्क व अधिकारावर गदा आली आहे. वादींना वाद मिळकतीचे संरक्षण करण्याचे व त्याचे उपभोग घेण्याचे संपूर्ण हक्क व अधिकार आहेत. प्रतिवादींनी सन २०१४ मध्ये वादीच्या वाद मिळकतीतून पाईपलाईन टाकण्याकरीता संमती दिली असल्याचे सिध्द केलेले नाही. तसेच वादींनी जून २०२२ मध्ये वाद मिळकतीत प्रतिवादींची पाईपलाईन फोडली असल्याचे सिध्द केलेले नाही. याउलट प्रतिवादी क्र. १ ने त्याच्या उलटतपासात वादीच्या शेतात असलेल्या ऊस पिकाचे नुकसान व्हावे म्हणून त्यांनी वादींविरूध्द वादीच्या वाद मिळकतीतून पाईपलाईन काढण्याकरीता तहसिलदार, करमाळा यांच्याकडे अर्ज दिला असल्याचे मान्य केले. यावरून दिसून येते की, प्रतिवादींनी वादींचे नुकसान करण्याच्या दुष्ट हेतूने वादींविरूध्द तहसिलदार, करमाळा यांच्यासमक्ष प्रकरण दाखल केलेले आहे. इतकेच नाही तर प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या उलटतपासात त्याच्या शेजारी असलेल्या लोकांनी वादींच्या वाद मिळकतीच्या बाजूला असलेल्या गायरान जमिनीतून त्यांची पाईपलाईन नेली असल्याचे मान्य केले. तसेच वादींनी त्याच्या उलटतपासात प्रतिवादींची मिळकत त्याच्या जमिनीच्या शेजारी नसल्याचे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रथमदर्शनी केस ही वादींच्या बाजूने असून न्यायाचा तराजूसुध्दा वादींच्या बाजूने आहे. जर प्रतिवादींना निरंतर ताकीदीचा हुकूम दिला नाहीतर वादींना वाद मिळकतीच्या हक्क व अधिकारापासून वंचित व्हावे लागेल व प्रतिवादी वादींच्या वाद मिळकतीत पाईपलाईन टाकुन वादींच्या कायदेशीर हक्क व अधिकारांवर गदा आणणार व वादींचे पैश्यात कधीही न भरून येणारे नुकसान होईल. त्यामुळे वादी प्रतिवादींविरूध्द

निरंतर मनाई हुकूम मिळविण्यास पात्र आहे म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ४ ची कारणे–**

**४४.** मी वरील ओहापोहवरून मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी दिलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.४ च्या अनुषंगाने पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| **१.** | वादीचा दावा मंजूर करण्यात येतो. |
| **२.** | प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की, त्यांनी वादींच्या वाद मिळकत क.ग.नं. वादींची मौजे खातगांव नं.१, ता.करमाळा जि.सोलापूर येथील क.ग.नं.१११ पैकी मधली पश्चिमेची क्षेत्र ० हे ८४ आर, पोटखराब ०हे २३ आर आकार ० रू.७५ पैसे एकूण ०१ हे ०७ आर या मिळकतीत वादींच्या उभ्या असलेल्या पिकातून जबरदस्ती ऊस मोडून खोदकाम करू नये व वादींच्या वाद मिळकतीत कोणत्याही प्रकारे पाईपलाईन टाकू नये असा निरंतरचा मनाई हुकुम देण्यात येतो. |
| **३.** | येणेप्रमाणे हुकुमनामा तयार करण्यात यावा. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

AMIT KISHORE SHARMA
Digitally signed by AMIT KISHORE SHARMA
Date: 2026.04.29 16:15:51 +0530

(अ.कि.शर्मा)

दिनांक २९/०४/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

करमाळा

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

(a) Name of the Stenographer :- Rutuja D. Gore
(b) Court :- Jt.CJJD & JMFC, Karmala
(c) Order signed by P.O.on :- 29/04/2026
(d) Order uploaded on :- 29/04/2026